**R.C.C. No. 86/2021**
**Exh.No.61**

**Deposition of Witness No.9 for the prosecution,**
I do hereby on solemn affirmation state that,

| | | |
|---|---|---|
| My name | : | Dr. Sharad Madhavrao Satpute |
| Age | : | 64 years |
| Occu. | : | Medical Officer, |
| R/o | : | Sakhar Kamgar Hospital, Shrirampur. |

**Examination in Chief by Ld. Advocate Shri. D. V. Patil for prosecution**

1. I have completed my education upto B.A.M.S. I am working as a medical officer since may 1988.

2. On 18.07.2020 I was working as Medical Officer at Sakhar Kamgar Hospital, Shrirampur. On that day patient by name Vikas Dilip Asane was brought to our hospital by his relatives. He was come with history allegedly assault by some known person by 03.30 p.m. on same day. For identification of said patient we have taken his thumb impression. I have examined the said patient and found following injuries;

i. C.L.W. over occipital reason having size 3 X 1 X 1 C.M.

ii. Abrasion over left hand.

The cause of injuries was hard and blunt object. We have taken X-ray skull A.P. Lateral and CT scan of head skull. They were within normal limits. The age of injuries were within 6 to 8 hours. The nature of injuries were simple in nature. The said patient discharged on 25.07.2020. I have issued injury certificate in the name of said patient. Now the injury certificate shown to me is the same. It bears my signature and its contents are true and correct. It bears the seal of our hospital. It is marked as **Exh.62.** Now weapon article – A shown to me.

The aforesaid injuries sustained by said person could be possible by weapon article – A.

**Examination in chief over.**

**<u>Cross-Examination of the witness for the accused by Adv. Shri. A. S. Shelke</u>**

3. It is not true to say that, the MLC certificate and record has been prepared as per say of accused. It is true to say that, I am not specialized Medical Officer in Neurology, radiology and Ortho. It is true to say that, every injury will change its color by period of time. It is true to say that, the age of injury determined by its color. It is true to say that, the color of injuries has not been mentioned in injury certificate Exh.62.

Question : The like nature injuries sustained by the said patient would be possible in day to day agriculture work ?

Answer : It depends upon how patient fall on the ground, other surface and hard and blunt object.

It is not true to say that, I am deposing false.

**Cross Examination is over.**
**No re-examination**

**R.O.A.C.**

sd/-

Date : 06/11/2025.
Place : Shrirampur

**(A. S. Kamble)**
Judicial Magistrate (F.C.)
Court No.2, Shrirampur.

**<u>CERTIFICATE.</u>**

Taken before me & signed by me in the presence of the accused to whom the deposition was explained & opportunity given to cross examine.

sd/-

Date : 06/11/2025.
Place : Shrirampur

**(A. S. Kamble)**
Judicial Magistrate (F.C.)
Court No.2, Shrirampur.

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२१**

**सरकार वि. दादासाहेब आसणे व इतर**

**निशाणी क्र.६३**

**<u>साक्षीदार क्र. १० चा शपथेवर जबाब.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – नवनाथ रघुनाथ बर्डे,

**वय** – ५० वर्षे, व्यवसाय –पो.हे.कॉ. बक्कल नं.१५८,सध्या नेमणूक श्रीरामपूर तालुका पो. स्टेशन श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.व्ही.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

१. दि.२०.०७.२०२० रोजी मी श्रीरामपूर तालुक पो.स्टेशन येथे पो.हे.कॉ. म्हणून कार्यरत होतो. सदर रोजी गु.र.क्र. २२२/२०२० चा तपास माझ्याकडे वरीष्ठांच्या लेखी आदेशाने वर्ग करण्यात आला. आता मला सदरचा आदेश दाखवला. तो तोच असून त्यावर तत्कालीन ठाणे अंमलदार यांची सही आहे. ती मी ओळखतो. सदरचा आदेश मला उद्देशून आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.६४** देण्यात आले. सदर आदेशासोबत मला फिर्यादीचा जबाब, प्रथम खबर व दैनींक अहवाल प्राप्त झाला.

२. माझ्या तपासादरम्यान मी घटनास्थळी जावून घटनास्थळाचा पंचनामा निशाणी क्र.६० केला. सदरचा पंचनामा दि.२१.०७.२०२० रोजी सकाळी १०.०० ते १०.३० वाजाच्या दरम्यान केला. आता मला सदरचा पंचनामा दाखवला. तो तोच असून त्यावर माझ्या व पंचाच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनामा करतेवेळी मी घटनास्थळाचा फोटो घेतला होता. आर्टीकल ब वरील फोटो तोच आहे. सदर फोटोमध्ये मी स्वतः, फिर्यादी व दोन पंच उभे असल्याचे दिसते. त्यांनतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. दि.२८.०७.२०२० रोजी आरोपी सागर भाऊसाहेब आसणे व इतर आरोपी पोलीस स्टेशनला हजर झाले व त्यांनी गुन्ह्यात वापरलेला लोखंडी गज व ट्रॅक्टर हजर केला. त्यानुषंगाने सदर ट्रॅक्टर व गज पंचासमक्ष जप्त केले व जप्ती पंचनामा निशाणी क्र.५८ केला. आता मला सदरचा जप्ती पंचनामा दाखवला. तो तोच असून त्यावर

माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. आरोपींना अटक केली व अटक पंचनामे केले. त्यानंतर सदर मुद्देमालाची मुद्देमाल पावती तयार केली व मुद्देमाल पोलीस स्टेशनला जमा केला. आता मला सदर मुददेमाल पावती दाखवली ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.६५** देण्यात आले. त्यानंतर गुन्ह्यातील जप्त ट्रॅक्टर न्यायालयाच्या आदेशाने ट्रॅक्टर मालकास परत दिले. घटनास्थळाचा ७/१२ उतारा हस्तगत केला. त्याचा गट क्र.१०२/५ मौजे माळवडगाव असे होते. आता मला सदरचा ७/१२ उतारा व खातेउतारा दाखवला. सदर ७/१२ व खातेउता-यास अनुक्रमे **निशाणी क्र.६६ व ६७** देण्यात आले. तसेच मी फेरफार क्र.५७८९ ची प्रत हस्तगत केली. आता मला सदरची प्रत दाखवली. ती तीच असून त्यास आर्टीकल ब देण्यात आले.

३. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी साखर कामगार हॉस्पीटल यांना वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्र दिले. आता मला सदरचे पत्र दाखवले. ते तेच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पत्र प्राप्त झालेबाबत साखर कामगार हॉस्पीटल यांचे सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र.६८** देण्यात आले. त्यानुषंगाने मी जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र निशाणी क्र.६२ हस्तगत केले. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पंचनामा करुन ट्रॅक्टर मालकाच्या ताब्यात सुपुर्तनामा करुन दिले. आता मला सदर सुपुर्तनाम्याची व न्यायालयाचे फौ.किरकोळ अर्ज क्र.२४७/२०२० मधील पत्राची प्रत दाखवली. सदर पत्र व सुपुर्तनाम्याच्या प्रतिस **आर्टीकल क व ड** देण्यात आले.

४. माझ्या तपासाअंती आरोपीने गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीसोबतचे शेतीच्या वादातून फिर्यादी व साक्षीदार यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न केला व गजाने मारहाण करुन जखमी इसमास दुखापत पोहोचवली तसेच फिर्यादीचे शेतातील घासाचे पीकाचे नुकसान केलयाचे निष्पन्न झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.मी जप्त हत्यार आजरोजी पाहिल्यास ओळखू शकतो. आर्टीकल अ वरील लोखंडी रॉड तोच आहे. आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी दोन आरोपी हजर आहेत इतर आरोपीतर्फे गैरहजेरीमाफीचा अर्ज देण्यात आला.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए.एस.शेळके यांचेमार्फत सुरु....</u>**

**५.** हे म्हणणे खरे आहे की, दोषारोपपत्रात नमूद केलेले पंच हे माझ्या वैयक्तीक ओळखीचे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंच हे फिर्यादी व फिर्यादीचे नातेवाईकांनी आणले होते.

**मध्यंतराची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब....**

**<u>शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए.एस.शेळके यांचेमार्फत पुन्हा सुरु...</u>**

**६.** साक्षीदार क्र.१ विकास आसणे याचा जबाब मी नोंदवला होता. त्याचा जबाब नोंदवतेवेळी सदर साक्षीदाराने आरोपींनी माझ्या बहिणीच्या पोटात लाथा मारल्या हे सांगितले नव्हते. तसेच त्याने माझ्या आईला ट्रॅक्टर घालून मारण्याची धमकी दिल्याचा मजकूर सांगितला होता. आता मला सदर साक्षीदाराचा जबाब दाखवला. त्यामध्ये विकास आसणे याने आमच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जिवे ठारण मारण्याची धमकी दिली असे नमूद आहे. साक्षीदार क्र.२ दिलीप सुदाम आसणे याचा जबाब मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. आता मला सदर साक्षीदाराचा मी नोंदवलेला जबाब दाखवला. सदर साक्षीदाराचा परिच्छेद अ मधील मजकूर मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला आहे. साक्षीदार क्र.३ सुशिला आसणे हिचा जबाब मी तिच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला. आता मला तिचा मी नोंदवलेला जबाब दाखवला. मला सदर साक्षीदाराने मक्क्याच्या पीकाचे नुकसान झाल्याचे व माझा मुलगा विकास खाली पडल्याचा मजकूर सांगितला नव्हता. साक्षीदार क्र.५ जयश्री दिलीप आसणे हिचा जबाब मी तिच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला. तिने तिचा जबाब देतेवेळी घटना हि दि.१८.०७.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता 'आमच्या शेतात' घडली हा मजकूर सांगितला होता. आता मला मी नोंदवलेला तिचा जबाब दाखवला. त्यामध्ये सदरचा मजकूर नमूद आहे. सदर साक्षीदाराने तिचा जबाब नोंदवतेवेळी जमीन नांगारायला सुरवात केली व शेतात ट्रॅक्टर घालू नका हा मजकूर सांगितला नव्हता. तसेच साक्षीदार क्र.६ संदीप आसणे याचा जबाब देखील मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता.

**७.** हे मला माहित नाही की, घटनेतील नमूद शेतजमीनीबाबत दिवाणी न्यायालयात वाद चालू आहे किंवा कसे. मला फिर्यादी व साक्षीदाराने दिवाणी वादाची

माहिती दिली नाही. मी जमिनीच्या ताब्याबाबत महसूल अधिका–यांकडे अथवा भूमीअभिलेखकार्यालयाकडे तपासणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार व ७/१२ उतारे हे मला फिर्यादीने दिले. हे म्हणणे खरे आहे की, मी ७/१२ उता–यावरुन वादादीत मालकी फिर्यादीची असल्याचे म्हणत आहे. मी सदर ७/१२ उता–याव्यतीरीक्त वादादीत मिळकतीचे मालकीबाबत इतर कोणतीही चौकशी केली नाही. हे मला आठवत नाही की, मी सदर कामी स्वतंत्र साक्षीदार  तपासले किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचे जबाब नोंदवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, चूकीचा तपास केला व चूकीचे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तपासादरम्यान आरोपीविरुद्ध कोणताही गुन्हा निष्पन्न् झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ वरील लोखंडी रॉड हा फिर्यादी कुटुंबीयांनी मला पुरवला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

sd/–

**(ए.एस.कांबळे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांक – ०६/११/२०२५.

न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.